पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक - ३२३ दिनांक - ०३/०५/२०२३**

## सामाजिक सुरक्षा विभाग,गुन्हे शाखा,पुणे शहर

## पश्चिम बंगाल येथील दाखल गुन्हयातील लग्नाचे आमिष दाखवुन पुण्यात आणलेल्या अपहृत अल्पवयीन बालिकेचा तात्काळ शोध

दि.२५/०४/२०२३ रोजी मा.वरीष्ठांच्या आदेशाने बोसिरहाट पोलीस स्टेशन (पश्चिम बंगाल) गुरनं २२७/२०२३ भादवि ३६३,३६५ मधील पश्चिम बंगाल येथील अपहृत बालिकेचा सामाजिक सुरक्षा विभागाचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक भरत जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि. अनिकेत पोटे, पो.हवा. भिवरकर, पो.अमंलदार कोळगे,कुंभार,जमदाडे यांनी तांत्रिक विश्लेषनाचे आधारे सदर बालिकेचा सोपानबाग ढोबरवाडी रेल्वे पटरीच्या शेजारी शोध घेवुन सदर अपहृत बालीका मिळुन आल्याने तिला दिनांक ०३/०५/२०२३ रोजी बाल कल्याण समिती पुणे याचे आदेशाने बोसिरहाट पोलीस स्टेशन (पश्चिम बंगाल) चे पो.उप निरीक्षक प्रतिबिदुं दास व त्याचा स्टाफ यांचे ताब्यात पुढील तपास कामी देण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर,श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त, पुणे शहर,श्री.संदिप कर्णिक, मा.अपर पोलीस आयुक्त,गुन्हे,पुणे श्री.रामनाथ पोकळे, मा.पोलीस उप आयुक्त गुन्हे,श्री.अमोल झेंडे, यांचे आदेश व मार्गदर्शनाखाली सामाजिक सुरक्षा विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, भरत जाधव तसेच सहा पोलीस निरीक्षक अनिकेत पोट,पोलीस अंमलदार तुषार भिवरकर,रेश्मा कंक,संदिप कोळगे,अमित जमदाडे,ओंकार कुंभार या पथकाने यशस्वी केली आहे.